CORO

ग्रासरूट्स नेतृत्व विकास कार्यक्रम (GLDP) २०२७

माहिती पत्र

प्रिय साथी/संस्था/संघटना प्रतिनिधी

सस्नेह नमस्कार !

'कोरो इंडिया' गेल्या ३७ वर्षांपासून वंचित समूहातील नेतृत्व विकासाचे काम करत आहे. यात प्रामुख्याने महिलांच्या नेतृत्व विकासावर अधिक लक्ष दिले गेले आहे. सोबतच वंचित समूहातील संस्था – संघटनांच्या संस्थाप्रतिनिधी यांची क्षमता विकसित करत त्यांच्या सामूहिक प्रक्रिया अधिक मजबूत करण्यावरही कोरो इंडिया भर देत आहे. ही प्रक्रिया २००८ पासून महाराष्ट्रात 'ग्रासरूट्स नेतृत्व विकास कार्यक्रम' GRASSROOT LEADERSHIP DEVELOPMENT PROGRAM (GLDP) या माध्यमातून अधिक व्यापक आणि संघटितपणे राबवायला सुरुवात केली. पुढे २०१५ मध्ये याचा विस्तार राजस्थानमध्ये ही करण्यात आला.

गेल्या १६ वर्षांत महाराष्ट्र आणि राजस्थानमधील वंचित समूहातील २५८१ लीडर्स आणि १०१७ संघटनांच्या संस्थाप्रतिनिधींनी या प्रक्रियेमध्ये भाग घेतला आहे. (या संस्था प्रतिनिधींपैकी बहुतेक संस्था प्रतिनिधी हे CBOs मधून आहेत). या लीडर्सच्या माध्यमातून २५ लाख लोकांपर्यंत थेट पोहोचता आले आहे.

'ज्यांचे प्रश्न त्यांचे नेतृत्व' या मूल्यावर आधारित समूहातील नेतृत्व उभे राहायला हवे. यासाठी वंचित समूहासोबत जोडून घेणे, त्यांना समजून घेणे, त्यांचे मुद्दे समजून घेऊन, समूहातील संस्था/संघटना यांचे नेतृत्व ओळखणे, त्यांना GLDP च्या प्रक्रियेत आणणे, त्यांच्यासोबत त्यांचे मुद्दे सोडविण्यासाठी पुढे निरंतर काम करणे अशा क्रमाने कोरो वंचित समूहाशी जोडून घेऊन काम करत आहे.

वरील पार्श्वभूमीच्या अनुषंगाने, संस्था/ संघटनांनी GLDP **कार्यक्रमाबाबत आपल्या संस्थेतील संबंधित लीडरसोबत सखोल आणि लक्षपूर्वक चर्चा करणे आवश्यक आहे.** कार्यक्रमासाठी योग्य प्रतिनिधीची निवड करणे ही संस्था / संघटना आणि लीडर या दोघांचीही महत्त्वाची जबाबदारी राहणार आहे.

त्यामुळे कार्यक्रमासाठी प्रतिनिधींची नावे सुचवताना निवड होण्यासाठी दिलेल्या निकषांचा काळजीपूर्वक विचार करावा. ज्या व्यक्तींची नावे सुचविण्यात येणार आहेत, त्यांच्यासोबत या पत्रात नमूद केलेल्या मुद्द्यांच्या अनुषंगाने पूर्व चर्चा करून त्यांची कार्यक्रमातील भूमिका, जबाबदारी आणि सहभाग याबाबत स्पष्टता निर्माण करणे ही संस्था / संघटनांची जबाबदारी असेल. तसेच, नेतृत्व विकास कार्यक्रमासाठी निवड झालेल्या लीडरला कार्यक्रमाच्या कालावधीतच नव्हे, तर पुढील कार्यकाळात आणि त्यानंतरही संस्था/ संघटनेसोबत जोडून घेऊन काम करणे अपेक्षित आहे. त्यामुळे प्रतिनिधींची नावे सुचविताना संस्था / संघटनांनी या बाबीचा विचार करावा.



अर्जासंबधित माहिती

ग्रासरुटस नेतृत्व विकास कार्यक्रमासाठी (GLDP) कोणत्या संस्था/संघटना अर्ज करू शकतात:

- संस्था/ संघटना/ समिती/ महिला मंडळे/ तरुण मंडळे/ अनौपचारिक गट जे किमान ३ वर्ष सामाजिक बदलाच्या प्रकियेत सातत्याने कार्यरत आहेत.
- अशा संस्था/ संघटना/ समिती/ महिला मंडळे/ तरुण मंडळे/ अनौपचारिक गट, ज्या मुख्यतः महिला, ट्रान्सजेंडर (पारलिंगी), दलित, आदिवासी, भटके-विमुक्त, अल्पसंख्यांक आणि अन्य मागासवर्गीय व इतर वंचित समूहांच्या मुद्द्यांवर/प्रश्नांवर काम करत आहेत.
- महिला व ट्रान्सजेंडर (पारलिंगी) व्यक्तींचे नेतृत्व असलेल्या संस्था/ संघटनांना प्राधान्य दिले जाईल.
- संस्था/ संघटनांची प्रशिक्षण, बैठका, असाइनमेंट, क्रॉस-लर्निंग आणि इतर कार्यक्रमातील उपक्रमांसाठी आवश्यक वेळ देऊन सक्रिय सहभाग देण्याची तयारी असावी.
- संस्थेचा ई-मेल आयडी आणि लीडर/फेलो यांचे ई-मेल आयडी असणे गरजेचा आहे, जर इ-मेल आयडी नसेल तर तो संस्था प्रतिनिधी यांनी तयार करावा.
- संस्था/संघटनांनी अशाच संभाव्य लीडर्स/ अर्जदार यांची नावे सुचवावी ज्यांना या कालावधीत इतर कोणत्याही संस्था/संघटनेची फेलोशिप मिळालेली नसेल. तसेच ह्या कार्यक्रमात सहभागी असताना, कोणतीही दुसरी फेलोशिप (ज्यामध्ये आर्थिक लाभ असेल) मिळाली किंवा घेतली तर लीडरला या लीडरशीप कार्यक्रमातून थांबवण्यात येईल.
- मागील सलग ३ वर्षांपासून ज्या संस्था/ संघटना या GLDP कार्यक्रमात सहभागी आहेत, त्या सलग चौथ्या वर्षी GLDP साठी अर्ज करू शकत नाहीत.
- कोणत्याही राजकीय पक्षाशी किंवा राजकीय पक्षीय संघटनेशी थेट संबंध असणारी अथवा पदावर असणारी व्यक्ती तसेच संबंधित संस्था/संघटना या कार्यक्रमासाठी अर्ज करू शकत नाहीत.
- या लीडरशीप कार्यक्रमात निवड झालेल्या लीडर्सना कुठल्याही प्रकरच्या राजकीय निवडणुकीमध्ये उभे राहता येणार नाही.लीडरच्या घरातील जवळची व्यक्ती (पती/ पत्नी/ सख्खा/ सख्खी बहिण-भाऊ, आई, वडील, मुलगा, मुलगी) हे जर कुठल्याही प्रकारच्या राजकीय निवडणुकीमध्ये उभे राहिले असतील तर, त्यांना या कार्यक्रमासाठी अर्ज करता येणार नाही. तसेच लीडरचा प्रत्यक्ष आणि अप्रत्यक्ष सहभाग (प्रचार - प्रसार, इत्यादी) कुठल्याही निवडणुकीत असायला नको . जर असे काही आढळल्यास लीडरला या लीडरशीप कार्यक्रमातून थांबवण्यात येईल.

ग्रासरुटस नेतृत्व विकास कार्यक्रमासाठी (GLDP) संस्था/संघटनाच्या वतीने लीडर नेतृत्व विकास कार्यक्रमात कोण सहभागी होऊ शकतात:

- ग्रासरूट नेतृत्व विकास कार्यक्रमासाठी एका संस्था/ संघटनेतून जास्तीत जास्त ५ संभाव्य लीडरची नावे सुचविता येतील. यामध्ये किमान ३ अर्ज महिला आणि ट्रान्सजेंडर (पारलिंगी) समूहातील अर्जदारांचे असणे अपेक्षित आहे.
- अर्जदार हा संबंधित संस्था/ संघटनेसोबत किमान २ वर्षांपासून काम करत असावा.
- संस्था प्रमुखांनी स्वतः लीडर म्हणून अर्ज करू नये.
- अर्जदारामध्ये नेतृत्वाची क्षमता, शिकण्याची तयारी आणि सामाजिक बदलासाठी काम करण्याची बांधिलकी असावी. तसेच, कार्यक्रमाच्या माध्यमातून स्वतःचे नेतृत्व विकसित व सिद्ध करण्याची तयारी असावी.
- अर्जदार ज्या गाव/ वस्तीमध्ये काम करणार आहे, शक्यतो त्याच गाव/ वस्तीचा रहिवासी असावा.



- अर्जदाराचे संबंधित संस्था/ संघटनेचे प्रमुख किंवा मुख्य पदाधिकारी यांच्याशी कोणतेही कौटुंबिक नाते नसावे.
- अर्जदारांच्या निवडीमध्ये महिला आणि ट्रान्सजेंडर (पारलिंगी) व्यक्तींना प्राधान्य दिले जाईल.
- शैक्षणिक अट नाही: शिक्षणाची कोणतीही अट नाही; केवळ काम करण्याची जिद्द आणि २ वर्षांचा अनुभव आवश्यक.
- अर्जदाराचे वय अर्ज करण्याच्या वेळी किमान २० वर्षे पूर्ण असावे.
- संस्था/संघटनांनी अशाच संभाव्य लीडर्स/ अर्जदार यांची नावे सुचवावी ज्यांना या कालावधीत इतर कोणत्याही संस्था/संघटनेची फेलोशिप मिळालेली नसेल. तसेच ह्या कार्यक्रमात सहभागी असताना, कोणतीही दुसरी फेलोशिप (ज्यामध्ये आर्थिक लाभ असेल) मिळाली किंवा घेतली तर लीडरला या लीडरशीप कार्यक्रमातून थांबवण्यात येईल.
- **कोणत्याही राजकीय पक्षाशी किंवा राजकीय पक्षीय संघटनेशी थेट संबंध असणारी अथवा पदावर असणारी व्यक्ती तसेच संबंधित संस्था/संघटना या कार्यक्रमासाठी अर्ज करू शकत नाहीत.**
- **या लीडरशीप कार्यक्रमात निवड झालेल्या लीडर्सना कुठल्याही प्रकरच्या राजकीय निवडणुकीमध्ये उभे राहता येणार नाही.लीडरच्या घरातील जवळची व्यक्ती (पती/ पत्नी/ सख्खा/ सख्खी बहिण-भाऊ, आई, वडील, मुलगा, मुलगी) हे जर कुठल्याही प्रकारच्या राजकीय निवडणुकीमध्ये उभे राहिले असतील तर, त्यांना या कार्यक्रमासाठी अर्ज करता येणार नाही. तसेच लीडरचा प्रत्यक्ष आणि अप्रत्यक्ष सहभाग (प्रचार - प्रसार, इत्यादी) कुठल्याही निवडणुकीत असायला नको . जर असे काही आढळल्यास लीडरला या लीडरशीप कार्यक्रमातून थांबवण्यात येईल.**

ग्रासरुटस नेतृत्व विकास कार्यक्रमाचे (GLDP) स्वरूप:

- ग्रासरूट नेतृत्व विकास कार्यक्रमाचा कालावधी १ वर्षाचा असेल.
- ग्रासरूट नेतृत्व विकास कार्यक्रमांतर्गत **लीडरसाठी ५ प्रशिक्षणे आणि संस्था/ संघटनांच्या प्रमुखांसाठी ४ प्रशिक्षणे** आयोजित केली जातील.
- प्रत्येक प्रशिक्षणाचा कालावधी साधारणत: **४ ते ५ दिवसांचा** असेल. लीडर तसेच संबंधित संस्था/ संघटनेच्या प्रमुखांचा सर्व प्रशिक्षणांमध्ये **सक्रिय व पूर्ण सहभाग बंधनकारक** असेल.
- कार्यक्रमाच्या एक वर्षाच्या कालावधीत प्रत्येक लीडरला **दरमहा रु. ६,०००/- मानधन** देण्यात येईल. (उपलब्ध निधी/ संसाधनावर अवलंबून असेल).
- ग्रासरूट नेतृत्व विकास कार्यक्रमाच्या प्रक्रियेअंतर्गत, संस्था/ संघटनेच्या प्रतिनिधीला नेतृत्व विकासासाठी **मानधन** देण्यात येईल. एका लीडरची निवड झाल्यास **रु. २५,०००/-** आणि दोन लीडरची निवड झाल्यास **रु. ५०,०००/- इतकी रक्कम** दोन टप्प्यांमध्ये देण्यात येईल. (उपलब्ध निधी/संसाधनावर अवलंबून असेल)
- संस्था प्रतिनिधी आणि लीडर यांनी एक वर्षभर केलेल्या कामाला दृश्य स्वरूप देण्यासाठी वर्षाच्या शेवटी प्रत्येक लीडरला ग्रासरूट कार्यक्रमासाठी रु. १०,०००/- देण्यात येईल.
- कार्यक्रमाच्या कालावधीत आयोजित करण्यात येणाऱ्या **सर्व प्रशिक्षण, कार्यशाळा आणि संबंधित कार्यक्रमांचा खर्च कोरो इंडियाच्या वतीने करण्यात येईल.**



ग्रासरुटस नेतृत्व विकास कार्यक्रमातील (GLDP) अपेक्षा :

- ज्या लीडरचे नाव आपण सुचवणार आहात, त्यांचा ई-मेल आयडी असणे अनिवार्य आहे. लीडरकडे ईमेल आयडी नसल्यास, संस्था प्रतिनिधीने त्यांचा ईमेल आयडी तयार करून द्यावा.
- नि:शुल्क सहभाग: या कार्यक्रमासाठी कोणतेही शुल्क आकारले जात नाही.
- लीडर व संस्था/ संघटना प्रतिनिधींची संबंधित प्रशिक्षणे, बैठका व इतर कार्यक्रमांना उपस्थिती अनिवार्य आहे.
- लीडर आणि संस्था/ संघटना प्रमुख यांनी **कार्यपाठ व अहवाल वेळेत पूर्ण करणे,** तसेच लीडरच्या वैयक्तिक विकासाचा आणि कामाच्या प्रगतीचा **वेळोवेळी आढावा घेऊन आवश्यक मार्गदर्शन व सहकार्य करणे** अपेक्षित आहे.
- वरील अपेक्षा पूर्ण न केल्यास तसेच बेजबाबदार/ बेशिस्त वर्तन आढळल्यास लीडर व संस्था/ संघटना यांचा कार्यक्रमातील सहभाग रद्द केला जाईल.
- जर आपली निवड झाली तर, या लीडरशीप कार्यक्रमाच्या दरम्यान आपण इतर कोणतीही दुसरी फेलोशिप घेऊ शकत नाही/ सहभागी होऊ शकत नाही.
- कार्यक्रमाचा उद्देश प्रभावीपणे साध्य होण्यासाठी लीडर आणि संस्था/ संघटना यांनी **परस्पर समन्वय, जबाबदारी आणि सातत्यपूर्ण सहभाग राखणे** अपेक्षित आहे.
- कार्यक्रमादरम्यान काही अडचण आल्यास फेलो/ लीडर आणि संस्था/ संघटनेने **कोरो इंडियाच्या टीमसोबत वेळेत चर्चा करावी,** जेणेकरून योग्य मार्ग काढता येईल.

प्रस्तावित संख्या : ग्रासरूट नेतृत्व विकास कार्यक्रमांतर्गत एकूण २४० लीडरची निवड करण्यात येणार आहे. यापैकी महाराष्ट्रातून १२० आणि राजस्थानमधून १२० लीडरची निवड केली जाईल. त्यानुसार संबंधित संस्था/ संघटनांचीही निवड करण्यात येईल.

निवडप्रक्रिया वेळापत्रक (Schedule) आणि पद्धती:

- वरील सर्व कार्यक्रमाची निवड प्रक्रिया पार पाडण्याकरिता राज्य आणि विभाग पातळीवर स्वतंत्र निवड समिती कोरो आणि कोरोच्या प्रक्रियेत वेगवेगळ्या टप्प्यांवर सहभागी असणाऱ्या संस्था/ संघटना प्रतिनिधी, तसेच संसाधन व्यक्ती यांच्या माध्यमातून गठित करण्यात येईल. निवड प्रक्रियेचे अंतिम अधिकार हे कोरो, इंडियाकडे राहतील .
- संस्था/ संघटना प्रमुखांना/ प्रतिनिधीना कार्यक्रमातील सर्व टप्प्यातील प्रक्रियेत सहभागी व्हावे लागेल.
- संपूर्ण निवड प्रक्रिया तीन टप्प्यात पूर्ण होईल.



टप्पा	प्रकिया	कालावधी	पद्धत	जबाबदार यंत्रणा
प्रारंभ	**अर्ज स्वीकारणे**	१६ नोव्हेंबर से ३० नोव्हेंबर	ऑनलाइन / ऑफलाइन	संस्था संघटनां प्रतिनिधी/ निवड समिती सदस्य
टप्पा १	**स्क्रूटिनी**	०१ डिसेंबर ते १० डिसेंबरपर्यंत	अंतर्गत पडताळणी	निवड समिती सदस्य/ कोरो टीम
टप्पा २	**फील्ड विजिट (Field Visits)**	११ डिसेंबर ते ३० डिसेंबर	विभागीय प्रत्यक्ष भेट	निवड समिती सदस्य/ कोरो टीम
टप्पा ३	**मुलाखत**	१ जानेवारी ते ७ जानेवारी २०२७	प्रत्यक्ष / ऑनलाइन	निवड समिती सदस्य/ कोरो टीम
टप्पा ४	**अंतिम यादी जाहीर**	१० जानेवारी २०२७	प्रत्यक्ष	निवड समिती सदस्य/ कोरो टीम

अर्ज करण्यासाठी खालील प्रमाणे दोन पर्याय उपलब्ध असतील:

ऑनलाइन पर्याय:

- संस्था/ संघटनांनी CORO INDIA च्या संकेतस्थळावर/ वेबसाइट (www.coroindia.org) जाऊन प्रथम परिचयपत्र काळजीपूर्वकपूर्ण वाचून घ्यावे
- अर्ज करण्यासाठी खालील लिंकवर क्लिक करा: (https://apply.coroindia.org/apply)
- आपण संकेतस्थळावर आपली सहमती दिल्यावर तुम्हाला नोंदणी करता येईल.
- नोंदणी केल्यानंतर दिलेल्या ई-मेल आयडीवर संस्थेने भरण्याच्या फॉर्मची लिंक प्राप्त होईल.
- अर्ज भरताना सुचविण्यात येणाऱ्या संभाव्य लीडरची नावे लिहिणे अनिवार्य आहे.
- संस्थेचा नोंदणी फॉर्म भरल्यानंतर तो व्यवस्थित सादर करावा.
- त्यानंतर लीडर/ फेलोने अर्ज करण्याची लिंक ही संस्थेने दिलेल्या ई-मेल आयडीवर पाठविण्यात येईल.
- संस्थेच्या ई-मेल आयडीवर प्राप्त झालेल्या लिंकवर क्लिक करून संस्था प्रमुख आणि लीडर यांनी एकत्रित अर्ज भरावा. तसेच हा अर्ज भरताना लीडर/ फेलो यांचा ई-मेल आयडी लिहिणे अनिवार्य आहे.
- अर्ज भरताना दिलेली **सर्व माहिती अचूक आणि पूर्ण असणे आवश्यक आहे.**
- **संस्था प्रतिनिधी आणि लीडर यांनी भरलेला फॉर्म त्यांना त्यांच्या ई-मेल आयडीवर प्राप्त होईल.**

ऑफलाइन पर्याय:

- शक्यतो सर्वांनी अर्ज ऑनलाइन भरावा. ज्यांना ऑनलाइन अर्ज भरता येणार नाही, त्यांनीच ऑफलाइन फॉर्म भरावा.
- ऑफलाइन फॉर्म भरण्यासाठी खालील क्रमांकावर संपर्क साधावा. (ह्या नंबरवर सकाळी १० ते सायंकाळी ६ वाजेपर्यंतच संपर्क करावा)

संपर्क व्यक्तिचे नाव	सभंवी महाडीक	मोहिनी ठाकर	शुभम लळे	करीम शेख
संपर्क क्रमांक	8850118908	9372414088	8369377091	7039393303

